# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**लघुलेखक पदासाठी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची सेवा करार पध्दतीने नियुक्त करण्याबाबत.**

## //जाहिर सूचना//

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळात शासकीय किंवा निमशासकीय कार्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून सेवा करार पध्दतीने लघुलेखक पदासाठी इच्छुक असलेल्या तसेच अर्हता पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवाराकडून खालील अटी व शर्तीवर दिनांक २६/१०/२०२१, सायं. ५.०० वाजेपर्यंत आवक जावक विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईट, दुसरा मजला, सिनेप्लॅनेट सिनेमा समोर, शीव सर्कलजवळ, शीव (पूर्व) मुंबई ४०० ०२२ येथे टपालाद्वारे किंवा स्वहस्ते अर्ज मागविण्यात येत आहेत. तसेच सदर जाहिरात मंडळाच्या www.mpcb.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्जांचे लखोटे उघडण्यात येणार नाहीत. अर्ज करावयाच्या पाकीटावर पदाचे नाव ठळक अक्षरात नमूद करावे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता/अनुभव |
|---|---|---|---|
| ३ | लघुलेखक | १ | • कुठल्याही शाखेतील पदवी<br>• १२० श.प्र.मि. श्रुतलेखन/<br>• ३० श.प्र.मि. टंकलेखन (मराठी/इंग्रजी)<br>• मंत्रालयीन स्तरावर अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव या दर्जाच्या अधिकारी यांच्याकडे काम केल्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य |

**<u>अटी व शर्ती</u>**

१. लघुलेखक पदासाठी १२० श.प्र.मि. श्रुतलेखन व ३० श.प्र.मि. टंकलेखनाची मराठी व इंग्रजी लघुलेखक पदाचा तसेच मंत्रालयीन स्तरावर अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव या दर्जाच्या अधिकारी यांच्याकडे काम केल्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.

२. सदर पदासाठी सेवानिवृत्त झालेले/होणारे शासकीय अधिकारी/कर्मचारी अर्ज करण्यास पात्र असतील. त्यांना सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार परिश्रमिक देय राहील. तसेच शासन निर्णयातील सर्व अटी /शर्ती बंधनकारक राहतील.

३. करार पध्दतीने नेमणुकीकरिता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय ६२ वर्षापेक्षा अधिक नसावे.

४. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त १ वर्षासाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरिता नूतनीकरण करता येईल, परंतु एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

५. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.

६. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

७. कोणतेही कारण न देता अर्ज स्वीकारणे अथवा नाकारणे हा अधिकार मा. सदस्य सचिव, म. प्र. नि. मंडळ, मुंबई यांना राहील.

८. उमेदवाराचे कामकाज कोणत्याही वेळी असमाधानकारक आढळून आल्यास मा. सदस्य सचिव, म. प्र. नि. मंडळ, मुंबई यांच्या मान्यतेने एक महिन्याची पूर्वसूचना देऊन सेवा समाप्त करण्यात येईल.

९. आवश्यकतेप्रमाणे कमी अथवा ज्यादा पदे सेवा करार तत्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा. सदस्य सचिव, म. प्र. नि मंडळ, मुंबई यांना राहील.

सही/-

( **अशोक शिनगारे**, भा.प्र.से.)

**सदस्य सचिव**